# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

**<u>(घन कचरा व्यवस्थापन, आर/मध्य विभाग.)</u>**

सहा.अभि./आर-मध्य/10496/घकव्य दि.25.03.2026

## <u>स्वारस्य अभिव्यक्ती जाहिरात</u>

विषयः-आर/मध्य विभागातील स्मशानभूमी मधील दैनंदिन साफ़सफ़ाईच्या कामाकरीता बहुउद्देशीय कामगार कंत्राटी तत्वावर घेण्याकरीता संस्थेची नेमणुक करणे बाबत.

आर/मध्य विभागातील स्मशानभुमीमध्ये दैनंदिन रखरखाव व साफ सफाईच्या कामकाजाकरीता कंत्राटी तत्वावर बहुउद्देशीय कामगार पुरविण्याबाबतच्या कामाचा 1 वर्षाचा अनुभव असणा-या अशासकीय संस्थेची / कंपनीची नेमणुक करणेसाठी महानगरपालिकेच्या हद्दीमधील भविष्य निर्वाह निधी व राज्य कर्मचारी विमा योजनेमध्ये नोंदणीकृत असणा-या अशासकिय संस्था, खाजगी कंपनी इ. संस्थाकडुन त्यांची पात्रता यादी तयार करुन सोडत पद्धतीने निवड करण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

अर्जाचा नमुना आर/मध्य विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे रु. 3630/- अधिक 18 टक्के वस्तू व सेवा कर रोख स्वरुपात भरुन दि.25.03.2026 ते दि. 30.03.2026 सकाळी 10.30 ते दुपारी 05.30 या वेळेत विकत मिळु शकेल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप आर/मध्य विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी आर/मध्य विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा किंवा महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर भेट द्यावी. संस्थेने आर/मध्य विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि.30.03.2026 (दुपारी 01.00 वाजेपर्यंत).

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सही/-25.03.2026<br>
सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.)<br>
आर/मध्य विभाग